Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

# AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL



Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - II

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

# AJANTA

AJANTA
PRAKASHAN

Scanned with CamScanner

Dr. Sandip Tundulwar

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - II January - March - 2019

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतीय लोकशाही व्यवस्थेचा घटनात्मक विकास : एक ऐतिहासिक समालोचन<br>**प्रा. डॉ. विशाल अ. दौलतकार** | १-६ |
| २ | आधुनिक व्यापार पध्दती भारतीय व्यापार करीता एक आव्हान<br>**डॉ. प्रा. अजय दुबे** | ७-१० |
| ३ | ई-वाणिज्य आणि ऑनलाईन व्यापार<br>**प्रा. सुनिल एन. ढेरे** | ११-१५ |
| ४ | महाराष्ट्र राज्यातील इंजिनीयरींग महाविद्यालयांच्या ग्रंथालय वेबपेजेस द्वारा ग्रंथालयामध्ये उपलब्ध इलेक्ट्रॉनीक पाठ्य सामुग्रीचा अभ्यास<br>**श्री विकास एस. नगराळे** | १६-२३ |
| ५ | भारतातील कर सुधारणांचा आढावा संदर्भ जी.एस.टी.<br>**प्रा. गजानन रहाटे** | २४-२८ |
| ६ | ग्रामीण साहित्य संस्कृती व जागतिकीकरण<br>**प्रा. डॉ. मीना जुनघरे** | २९-३० |
| ७ | स्त्रियांच्या विकासात स्त्री शिक्षण तंत्राचे मूल्यात्मक योगदान<br>**प्रा. डॉ. अर्चना पी. गुल्हाने** | ३१-३४ |
| ८ | भारतातील शेतीसमोरील आव्हाने व उपाय<br>**डॉ. विठ्ठल घिनमिने** | ३५-४१ |
| ९ | इतिहास आणि पर्यटन एकाच नाण्याच्या दोन बाजु<br>**डॉ. किशोर भुमन्ना अग्गुवार** | ४२-४४ |
| १० | ऑनलाईन मार्केटिंग : नव उद्योजकांना संधी<br>**प्रा. अमोल स. राऊत** | ४५-४८ |
| ११ | यवतमाळ जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेचे भौगोलिक विश्लेषण<br>**प्रा. यशवंत प्रयाग राठोड** | ४९-५२ |
| १२ | मानवी जीवनात पोषणाचे महत्व<br>**प्रा. कु. सरोज या. लखदिवे** | ५३-५५ |
| १३ | ऑनलाईन व्यवहार आणि त्याची उपयुक्तता<br>**प्रा. माधुरी पंडीतराव राखुंडे** | ५६-५९ |




Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | कृषी आणि कृषी उद्योगाची वाटचाल<br>**प्रा. डॉ. प्रतिभा काळमेघ** | ६०-६३ |
| १५ | आर्थिक कल्याणाच्या सिध्दांताचे चिकित्सक अध्ययन<br>**प्रा. डॉ. नारोगाव के. सोरे** | ६४-६८ |
| १६ | प्रिया तेंडूलकर यांची कथा : एक दृष्टिक्षेप<br>**प्रा. डॉ. अन्नपूर्णा अजाबराव चौधरी** | ६९-७१ |
| १७ | धर्मनिरपेक्षता आधुनिक विचार<br>**प्रा. संदीप तुंडूरवार** | ७२-७७ |
| १८ | राष्ट्संतांचा राष्ट्रवाद<br>**प्रा. अनिल जा. दौलतकार** | ७८-८१ |
| १९ | समाज परिवर्तनात सामाजिक माध्यमांची / प्रसार माध्यमांची भूमिका<br>**प्रा. डॉ. जयमाला लाडे** | ८२-८६ |
| २० | ग्रामगीतेतून प्रकटणारा विद्यार्थी विकास दृष्टीकोन<br>**प्रा. विवेक भिकाभाऊ कोल्हे**<br>**प्रा. डॉ. देवराव नामदेवराव राठोड** | ८७-८९ |
| २१ | साहित्य समाजशास्त्र<br>**प्रा. राहूल एस. खंडारे** | ९०-९४ |
| २२ | भारतीय लोकशाही आणि प्रादेशीकवाद<br>**सहा. प्रा. लक्ष्मण बाबाराव यादव** | ९५-९८ |
| २३ | स्वातंत्र्योत्तार काळातील स्त्रियांची वाङमयीन चळवळ : स्त्रीवादी साहित्य<br>**डॉ. गणेश क. टाले** | ९९-१०३ |
| २४ | जंकफूडची वाढती लोकप्रियता व आरोग्यावर होणारे दुष्परिणाम यांचा चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. मनिषा मुलकलवार**<br>**डॉ. प्रमोद मुलकलवार** | १०४-११४ |
| २५ | भगवद्गीतेच्या १५ व्या अध्यायातील पुरुषोत्तम स्वरुप वर्णन - एक जीवन मूल्य<br>**प्रा. दर्शना तायडे (सायम)** | ११५-११८ |





Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २६ | शैक्षणिक दृष्ट्या मराठी भाषा साहित्याचे मूल्य<br>**प्रा. डॉ. युवराज श्रीराम मानकर** | १२१-१२४ |
| २७ | शैक्षणिक मुल्यांचे मराठी भाषा व मराठी वाङमयातील महत्व व स्थान : एक आढावा<br>**प्रा. सिध्दार्थ कुंडलिक इंगोले** | १२५-१२८ |
| २८ | शेती व क्षेत्र व नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना<br>**डॉ. शंकर मारोती सावंत** | १२९-१३३ |
| २९ | जागतिकीकरणानंतर कृषी क्षेत्राची दशा व दिशा<br>**डॉ. दिपक को. शृंगारे** | १३४-१३७ |
| ३० | इतिहास लेखनातील प्रवाह व पर्यटन<br>**प्रा. डॉ. राहूल वि. दखणे** | १३८-१४० |
| ३१ | भारतीय विचारवंतांचा शैक्षणिक मूल्य विचार<br>**प्रा. अनुप अरुण नांदगावकर** | १४१-१४४ |




Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १७. धर्मनिरपेक्षता आधुनिक विचार

**प्रा. संदीप तुंडूरवार**
विभागप्रमुख, पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर.

"प्रतिपच्चन्द्ररेखेव वर्धिष्णुर्विष्वन्दिता
षाहसुनोः षिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते"[1]

छत्रपती षिवरायांच्या राजमुद्रेवर कोरलेली ही षब्दषिल्प या देषातील संस्कृतीमूल्ये अधिष्ठित करणारी आहे. 'धर्मनिरपेक्षता', 'धार्मिक सहिष्णूता', 'सर्वधर्मसमभाव' ही परस्परपूरक पर्यायवाची नामावली भारतीय संस्कृतीची अभिजात मूल्ये मानली जातील. येथील धर्मनिरपेक्ष मूल्ये मानवाच्या सर्व प्रकारच्या अंगाषी संबंधित होती. मौर्य, सम्राट अषोक, अकबर, षिवाजी यांच्या राजवटी त्यामुळेच 'धर्मनिरपेक्ष' सदरात मोडणाऱ्या राहिल्यात. धर्माचा विचार मुळाषी असूनही 'धर्मनिरपेक्ष' राज्यव्यवस्था हे त्यांचे वर्णन होते. ही अभिनवव्यवस्था येथील मूल्यसंस्कृती प्रदर्षित करणारी आहे.

पाष्चात्य जगतात अस्तित्वात आलेला 'सेक्युलर' षब्द भारतीय दर्षनषास्त्रात, नीतीषास्त्रात मात्र वेगळया अंगाने, अर्थाने रूढ आहे. त्याचा रूढपणा आजतागायत तसाच कायम आहे. येथील धर्मजीवन राजकीय जीवनाहून कदापीही स्वतंत्र नव्हते. राज्यषास्त्राला त्यामुळे वेगळे न मानता 'नीतीषास्त्र' या संकल्पनेत मांडण्यात आले आहे. 'धर्म व राजकारण परस्परमिमुख' जरी असले तरी दोघांच्या कक्षा निष्चित परीघ ठरलेला होता. त्यामुळे येथील सहिष्णतेला अढसर राहिलेला नव्हता. वर्णवादी व्यवस्थेने जी वर्गीकृत व्यवस्था निर्माण केलेली होती त्यामुळे पाष्चात्य जगताप्रमाणे येथील जनतेला धर्मसत्तेच्या विरोधात संघर्ष करीत 'धर्मसत्ता व राजसत्ता' स्वतंत्र असावी असा उद्घोष करावा लागला नाही.

धर्मप्रणालीच्या नावावर ज्या अनेक रूढी, पंरपरा, चालीरीती, अंधश्रध्दा घुसल्यात त्यांना मात्र सातत्याने विचार प्रवर्तकांनी विरोध दर्षवून धर्माने मूळ कायम राखण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नातून मात्र अनेक नवी मूल्ये आकारास आली. संख्याषास्त्र, पुन्यवाद, लोकायत या संकल्पना स्थिरावल्या. कपील, कणाद, चार्वाक या विचारवंताना 'नास्तिक म्हटल्या जायचे. त्यांचाही विचार या देषात रूजू षकला. वाढू षकला. एका बाजूला धर्मप्रणालीत या मतावलंबीचे स्थान निर्माण झालेले होते तर दुसऱ्या बाजूला जैन, बौध्द, लिंगायत, षीख, कबीर इ. ची नवी धर्म विचारसरणी अस्तित्वात येऊन हिंदूधर्माअंतर्गत नव्या धर्माचा अविष्कार झाला, असे असले तरी मात्र मूळ 'सहिष्णूताच्या' गाभ्याला धक्का लागलेला नव्हता. पूर्णतः षांतता, संयम सहिष्णुतेच्या मार्गाने परिवर्तनाचा विस्तार प्रसृत झाला. प्राचीन कालखंडापासून होणारी ही स्थित्यंतरे धर्माच्या क्षेत्रात 20 व्या षतकापर्यंत कायम होती. राजा राममोहन रॉय, म. फुले, आगरकर, दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. विचारवंतानी धर्मातील विकृती विरूध्द सातत्याने बंड पुकारले होते. 1956 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी बौध्दधम्माचा केलेला स्वीकार ही अभूतपूर्व व ऐतिहासिक घटना होती. लक्षावधी समुदायाने घेतलेली दीक्षा नव्या सृजणतेचा परिचय असला तरी येथील मुळ गाभ्याला मात्र छेद दिलेला नव्हता ही बाब येथील 'धर्मनिरपेतेचे' प्रगटीकरण करणारी आहे.



Scanned with CamScanner

विखंडित भारताच्या निर्मीतीनंतर येथे वास्तव्याने राहिलेल्या विभिन्न धर्मियांना येथील संविधानाने पूर्णतः सामावून घेतले. कुठलाही कटू हेतू न ठेवता निर्मळ मनाने 'समतूल्य अधिकारांची' मांडणी केली. याचे कारण म्हणजे येथील प्राचीन मूल्य संस्कृतीत असलेलर धर्माच्या भिंती ओलांडून जोपासल्या जाणाऱ्या मानवतेत होती. प्रारंभिक काळात सर्व मतावलंबीना सामावून घेणाऱ्या या अतर्क्य क्षमतेमुळे विभिन्न धर्मांना सामावून घेतल्या गेले. भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारामधील घटना कलम 25 ते 28 मधील 'धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार' फारच सूचक आहे. मानवी मनातील श्रध्दांच्या जपणुकीसोबतच धर्मभेदावर आधारित भेदनिती जोपासल्या जाणार नाही याची दिलेली ग्वाही धंनिरपेक्षता जोपासण्याचा सर्वात प्रबळ असा वैधानिक दावा ठरतो. यात समाविष्ट असलेल्या घटना कलम 25(1) व 25(2) यातील आषय समजून घेणे तितकेच महत्त्वपूर्ण आहे.

'सेक्युलर', 'सेक्युलर स्टेट' या नावाखाली पाष्चात्य राष्ट्रे जी निकष, फूटपट्टी लावून व्यवस्थांचा स्तर मोजण्याचा प्रयत्न करतात ते मात्र निषेधार्त ठरते ! सर्वधर्माच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या 'महासागर' म्हणविल्या जाणाऱ्या भारताच्या सदर्भात ही वेगळया अर्थात व दृष्टीने बघणे गरजेचे आहे. 'सेक्युलर स्टेट' ची संकल्पना राष्ट्र–राज्याच्या उदयानंतर आलेली आहे. वस्तुतः हा षब्दप्रयोग 1851 मध्ये सामाजिक चळवळीच्या संदर्भात वापरण्यात आलेला होता. परंतु यानंतर या षब्दाचे 'राजकीयीकरण' झाले तेव्हापासून ही संकल्पना 'विवादाची' केंद्रबिंदू ठरली.

1648 मध्ये धर्मसत्तेचा पाष्चात्य जगात पराभव होऊन राजसत्ता धर्मप्रभावापासून मुक्त झाल्यात तेव्हापासून 'सेक्युलर स्टेट' म्हणून मिरविण्याचा अट्टाहास युरोपात जन्माला आला. ज्या धर्मसत्तेचे म्हणजेच ख्रिष्चन धर्माचे जोखड फेकून देण्याचा प्रयत्न झाला त्या धर्मात सहिष्णुतेला मोठा आधार आहे. 'अहिंसा परमोधर्मः' हा विचार ख्रिष्चन धर्माच्या तळाषी आहे असे असुनही युरोपातील जनमत धर्मसत्तेच्या विरोधात प्रबळ ठरले. मॅकियाव्हलीने 'द प्रिन्स' या ग्रंथात धर्मसत्तेचे वाभाडे काढून राजसत्तेला धर्मप्रभावापासून मुक्त करण्याचे सुतोवाच केलेले होते. युरोपात धर्मसत्तेच्या विरोधात संघटितपणे जषा चळवळी झाल्यात तसे मात्र भारतात घडले नाही. मौर्य साम्राज्य, अकबर, षिवाजी, षीख यांच्या राजवटी इ. च्या राज्यव्यस्था धार्मिकतेची सूचक असूनही धर्मनिरपक्षतेत मोडल्या. सोबतच युरोप सादृष्य परिस्थिती येथे आकारास आली नाही. याचा अर्थ जीवनमूल्ये, संस्कृती कषा स्वरूपाची आहे. यावरून राज्यव्यवस्थांचा स्तर निष्चित होत असतो. केवळ 'सेक्युलर स्टेट' षब्दप्रयोगाला संविधानिक मांडणीतून ते व्यक्त होऊ षकत नाही. हा मूळ गाभा भारतीय संकल्पनेचा आहे.

पाष्चात्य व भारतीय संदर्भात 'सेक्युलर' व 'सेक्युलर स्टेट' या मागील पार्ष्वभूमी तपासणी गरजेचे ठरतें. 'सेक्युलर' या राष्ट्रात 'धर्म' हे मूल्य सामावलेले आहे. या मूल्याकडे बघण्याचा दृष्टिकोन भारतीय व पाष्चिमात्यांचा भिन्न–भिन्न आहे, ही भिन्नताच 'धर्मनिरपेक्षता' या संकल्पनेत महदअंतर राखणारी आहे. त्याचा सखोल परिणाम अविष्कृत राज्यव्यवस्थांवर झाला. त्यामुळे पाष्चात्य धाटणीची राष्ट्रे व भारतीय राज्यव्यवस्था यात मूल्यात्मक भेद दृष्टिपथास येतो.

### पाष्चात्यांचा दृष्टिकोन

'सेक्युलर' या षब्दातील भावार्थाची परंपरा फार जुनी आहे. "सिझरचा भाग सिझरला द्या व देवाचा भाग देवाला द्या" हे त्याविषयीचे वचन प्रसिध्द आहे. इहलोक व परलोक ही भिन्न क्षेत्रे आहेत. त्यावर वेगवेगळया सत्ता



Scanned with CamScanner

असाव्या एकाच सत्तेखाली ही दोन्ही क्षेत्रे असू नयेत हा त्याचा भावार्थ आहे. ख्रिष्चन धर्माच्या उदयाच्या वेळचा हा विचार आहे.[2]

रोमच्या पीठावर पोपची सत्ता आल्यानंतर मूळ विचार लोप पावला व दोन्ही क्षेत्रे एकाच प्रभावाखाली असावी व त्याचे प्रमुख धर्मसंस्थेकडे असावे. या विचाराला बळकटी मिळाल्यानंतर धर्मसत्तेचे प्राबल्य वाढले. 13 व 14 व्या षतकात राष्ट्र–राज्याचा उदय होऊ लागल्यानंतर युरोपातील राजांनी धर्मसत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न चालविला. पोप व राजा यांच्या संघर्षात पोपने माघार घेतली व ऐहिक जीवनावरील हक्क त्यागला. त्यातूनच 'सेक्युलॅरिझम' ही संकल्पना आकारास आली. राष्ट्रीय भावनेचा परिपाक म्हणून पोपची सत्ता नाकारल्या गेली. मात्र धर्माचे अस्तित्व, त्याचे महत्व नव्हते. या पार्ष्वभूमीवर ग्रीक विद्येचा सखोल अभ्यास होऊ लागला त्यातून विज्ञानवादाचा उदय होऊन धर्मसत्तेचे बळ कमी होऊन इहवादी षासन 'सेक्युलर सेट' ही संकल्पना उदयास येऊ लागली. 'राइन ऑफ रॅषनॅलिझम इन युरोप' या ग्रंथात विल्यम एडवर्ड लेकी स्पष्ट करतो. "सृष्टी घटनांविषयी लोकांमध्ये अज्ञान असते. त्यामुळे ऐहिक जीवनातील राजकारण, अर्थ, समाजरचना, षिक्षण इ. बाबी त्या त्या श्रद्धेनेच होत असतात. या वर्चस्वाला संपवून डोळसपणे निर्णय घेणे याला इहवाद म्हणजेच 'सेक्युलर' म्हटल्या जाते.[3]

पाष्चात्य जगतात 'सेक्युलर सेट' या षब्दाचा अर्थ दोन भिन्न विचारांनी घेतल्या जातो. साम्यवादी राष्ट्रे, 'निधर्मी राष्ट्रे' असे संबोधतात तर भांडवलवादी राष्ट्रे 'धर्मनिरपेक्ष' म्हणजेच सर्वसमावेषक राष्ट्र या अर्थाने संबोधन करतात. साम्यवादांचा धर्माला पूर्णतः नकार आहे. 'धर्म ही अफुची गोळी आहे' या मार्क्सप्रणीत सिद्धांताची बैठक त्यामागे आहे. त्यामुळे 1917 नंतर रषियात चर्चेस, मस्जिद यांच्यावर प्रतिबंध लादण्यात येऊन जनतेला परावृत्त करण्याचा प्रयत्न करण्यात आला. धर्म ही मानवी षोषणाची व्यवस्था असल्याचे साम्यवादी जगताला वाटायचे. भांडवलवादी राष्ट्रे म्हणून इंग्लड, जर्मनी, फ्रान्स, इटली, स्पेन, अमेरिका, ऑस्ट्रेलिया इ. देषांना विचारात घेतल्या जाते. यातील इंग्लड वगळता इतर राष्ट्रे संविधानिकदृष्टया धर्मनिरपेक्ष आहेत तर इंग्लड राजा चर्चचा प्रमुख मानल्या गेला असून ते धर्मधिष्ठित राज्य आहे. स्टुअर्ट घराण्यातील जेम्स प्रथम 'देवी सिद्धांताचा' पुरस्कर्ता होता. ही पार्ष्वभूमी लाभलेला इंग्लड व्यवहारात स्वतःला मात्र धर्मनिरपेक्ष मानतो. इंग्लडची धर्मनिरपेक्षतेची संकल्पना 'आर्थिक तत्त्वज्ञानावर' आधारलेली आहे. त्या ठिकाणी धर्म ही बाब अडचणीची असणार नाही. इटली, जर्मनीने द्वितीय महायुद्धात धर्माचा आश्रय घेऊनच युद्धज्वर निर्माण केलेला होता. 'षुद्ध आर्य वंष' ही भावना प्रखर धर्मांधतेची प्रतिकच होते. फ्रान्स, अमेरिका येथील व्यवस्थेने धर्मनिरपेक्षतेची मांडणी करतांना धर्माच्या आधारावरील भेदभावाला नकार दिला. थॉमस जेफरसनने 4 जुलै 1776 रोजी मांडलेला स्वातंत्र्याचा जाहीरनामा इहवादाची ग्वाही देणारा आहे. 1781 मध्ये अमेरिकेने संविधानातील पहिले विषोधन करताना राज्य हे धर्म (चर्च) पासून पृथक असेल हे स्पष्ट केले होते.[4] 1947 मध्ये अमेरिकन न्यायालयाने यावर पुनष्च भाष्य करताना स्पष्ट केले. "षासनाला केव्हाही चर्च बांधता येणार नाही तसेच एका किंवा सर्व धर्मांना कसलीही मदत देता येणार नाही अथवा धर्मोत्सवात भाग घेता येणार नाही."[5] हे स्पष्टपणे नोंदविले आहे. ख्रिष्चन धर्माची राजसत्ता मानल्या जाणारे व्हॅटिकन राज्य धर्मधिष्ठित असल्याची मांडणी करते. सोबतच धर्मनिरपेक्ष असल्याचे स्पष्ट करते. स्वित्झर्लॅंड, जर्मनी ही राष्ट्रे धर्मनिरपेक्ष (इहवादी) असल्याचे मान्य करीत असली तरी चर्चकरिता कर वसूली व धार्मिक षिक्षणाला सहाय्य करताना आढळतात. अमेरिकेत धर्मनिरपेक्ष षासनाच्या दृष्टीने स्पष्टतः विवेचन असूनही कॉंग्रेसच्या अधिवेषन काळात प्रार्थना म्हटली जाते. तेथील राष्ट्राध्यक्ष



Scanned with CamScanner

धार्मिक कार्यात सहभागी होत असतात. डॉ. वेदप्रकाष लुथेरा यांनी 'दि कन्सेप्ट ऑफ सेक्युलर स्टेट इन इंडिया' यामध्ये उल्लेख करताना जार्ज वॉषिंग्टन, जॉन ॲडम्स, मडिसन हे राष्ट्राध्यक्ष 'डे ऑफ थॅक्स गिव्हींग' या दिवषी जाहीर प्रार्थनेत सहभाग दर्षवित असल्याचे म्हटले आहे. याचा अर्थ धर्माला वगळून त्यांची आचरणषैली राहिलेली नव्हती. एकुणच इहवाद 'सेक्युलर' या संकल्पनेबाबत त्यांच्यात द्वंद आढळते. 'उक्ती व कृती' यांच्यात साम्य नसण्याचे कारण त्यांच्या जीवनसंस्कृतीत द्वंद असणे यात आहे.

इहवादाचा अर्थ निधर्मी राज्य असे करणाऱ्या व धर्मावर प्रतिबंध लादणाऱ्या रषियाला मात्र व्दितीय महायुद्ध काळात जर्मनीच्या आक्रमणानंतर धर्मावरील प्रतिबंध हटवून धर्मतत्त्ववेत्यांचा आश्रय घ्यावा लागलेला होता. मुळातूनच इहवादचा अतिरेकी अंधश्रद्धेतून निर्णय घेतल्या जात त्यामुळे पाष्चात्य जगतात या प्रणालीबाबत एकवाक्यात आढळत नाही. पारलौकिक जीवन व ऐहिक जीवन यांच्यातील अंर्तविरोधामुळे 'धर्मनिरपेक्षता' बाबत 'निरपेक्ष दृष्टिकोन निर्माण होऊ षकलेला नाही. मुस्लिम धर्मियांच्या राजवटी आणि त्यांची षासनव्यवस्था या त्याला अपवाद नाहीत. इहवादाचा अर्थ धर्माला नकार अथवा धर्मनिरपेक्षता असा नसून धार्मिक परंपराचा अट्टाहास असा न राखता विज्ञानवादी दृष्टिकोन, चिकित्सा, विकास, मानवता, सहिष्णुता या संदर्भात घेतल्या गेला असता तर चित्र वेगळे राहिले असते.

**भारतीय संकल्पना**

'सेक्युलर', 'सेक्युलॅरिझम', 'सेक्युलर स्टेट' यामधून पाष्चात्य जगतात व्यक्त होणारा भाव भारतीयाकरिता मात्र नवीन नव्हता याचे कारण भारतीयांची ती जीवनमूल्ये ती जीवनमूल्ये होती. येथील 'धर्म' हे मूल्य नेहमीच 'धर्मनिरपेक्ष' होते. त्यातील आषयही तसाच होता. त्यामुळे भारतीय संविधानात आलेली ही मूल्यव्यवस्था आयात केलेली नाही. 23 नोव्हेंबर 1949 ला संविधानातील विभिन्न घटकावर षेवटची चर्चा सुरू झाली त्यावेळी 'सेक्युलर' षब्दप्रयोग समाविष्ठ करण्याबाबत काही सभासदांचा आग्रह झाला त्यावर चर्चा करताना बहुसंख्य सदस्यांनी आपले मत प्रतिपादले. "भारतीय संविधानाचा पाया धर्मनिरपेक्षतेवर आधारलेला आहे. येथील ती जीवनमुल्ये आहे त्यामुळे त्याला स्वतंत्रपणे समाविष्ठ करण्याची गरज नाही.[6]

भारतीय जीवन परंपरेतून हे मूल्य साकारल्या गेले त्यामुळेच ज्या अनिष्ट परंपरामुळे समाजमन दुभंगल्या गेले. समाजाचे छात्रतेज लोप पावले त्या प्रवृत्तीवर वारंवार आसूड ओढून त्यातील अनिष्ट विचारांना बाजूला सारण्याचा भरीव प्रयत्न झाला. म. गांधीनी हिंदूधर्मातील कठोर मत प्रदर्षित करताना 'धर्मावरील कलंक' मानला याचे मुख्य कारण म्हणजे येथील ती धर्मप्रणाली नव्हती.

ऋग्वेद, रामायण, महाभारत, उपनिषदे, आरण्यके, संतवचने यापासून तर म. गांधी, स्वामी विवेकानंद, डॉ. आंबेडकर यांच्या विचारापर्यंत सहिष्णूतेचाच विचार मांडल्या गेला आहे. ते सर्वांच्या विचारांचे सार आहे. 'मानवता', 'पंथनिरपेक्षता', 'हे विष्वची माझे घर', वसुधैव कुटुंबकम', 'भूता परस्परे पडो मैत्र जीवांचे', 'अमृतस्य पुत्राः', 'सब भूमी गोपाल की' इ. संस्कृत विचारमूल्य येथील सहिष्णूता व्यक्त करणारी व जोपासणारी आहे.

इक्ष्वाकू परंपरेतील पुरू या राजाच्या काळात यवन व म्लेंच्छ यांना अवधभूमीत वास्तव्य करू दिल्याचे रामायणात संदर्भ मिळतात. याचा अर्थ रामायणपूर्व काळापासून जीव रक्षण, जीव संरक्षण ही भूमिका येथील संस्कृतीत आढळते. 'ईष्वराने संपूर्ण ब्रम्हांड व्यापलेले आहे' या तात्विकतेतच येथील संस्कृतीमूल्य स्पष्ट होते. महाभारतातील उल्लेख, मौर्य कालखंड, अकबराचा कालखंड गुजरातमधील जाधव राजाने पारषी समुदायाला दिलेला आश्रय,



Scanned with CamScanner

षिवरायांची थोरवी गाताना दिला जाणारा पुरंदराच्या सुने संदर्भातील संदर्भ 'अषीच अमुची आई असती तर सुंदर मी किती झालो असतो' यातून परस्त्री धर्म दाखविली गेलेली आस्था इ. कित्येक उदाहरणे पाष्चात्यांच्या 'सेक्युलर' संकल्पनेचा परीघ ओलांडून व्यक्त होणारी भावना आहे. याचे मुख्य कारण म्हणजे येथील समाजजीवन, राजकीय जीवन धर्मजीवनापासून नीती जीवनापासून कधीही वेगळे नव्हते स्वतंत्र राहिले नाही. नीती येथील जीवनाचा आत्मा होती. नीतीच्या संदर्भात म. गांधी म्हणतात, "नीतीवाचून असलेली बुद्धी ही वेष्येसमान आहे ती बाहेरून चमकेल, नाचेल, गायील, मुग्ध करील पण माणसाला खडयात नेऊन टाकील."[7] येथे धर्म हा नीतीचा पर्याय आहे. पाष्चात्यांची 'रिलीजन' ची संकल्पना व भारतीय 'रिलीजन' ची संकल्पना या परस्परात भिन्न आहेत. तथागताने धर्म ऐवजी 'धम्म' असा वापर केला ज्याचा अर्थ जाणीव, मानसिक जागरूकता असा आहे. 'धम्म' व्यक्तीला आत्मषांती, परमसहिष्णूतेकडे घेऊन जातो.[8] म. गांधीना धर्म हे मूल्य सदवर्तन, पावित्र्य, जनसेवा याचे प्रतिक वाटते.[9] महाभारतातील धर्माबाबतच्या भाष्यात 'समृद्ध व्यक्ती जीवन, निकोप समाज याकरिता व्यक्ती व राज्याने पार पाडावयाचे कर्तव्य' असे म्हटले आहे. एकाबाजूला पाष्चात्यांचा 'धर्म' धर्म परिवर्तनाचा विचार मांडतो त्या करीता सेवेच्या नावावर केल्या जाणाऱ्या लांछनास्पद कृत्याचे समर्थन करतो. तर दुसऱ्या बाजूला भारतीय प्रणालीतील धर्म जीवसेवा, मानवसेवा यांच्याषी नाते सांगते हा मूलभूत पूरक धर्माच्या व्याख्येत असल्याने ' धर्मनिरपेक्षता' यामध्ये आधीक्याने महदअंतर असेल हे निष्चितच!

म. गांधी 'धर्मनिरपेक्षतेच्या' संदर्भात भाष्य करतांना म्हणतात, "मुळातूनच मानवी जीवनाचे पारलौकिक व ऐहिक जीवन असे दोन भाग करता येणार नाही. जोपर्यंत पारलौकिक जीवनात निरपेक्षता येणार नाही तोपर्यंत ऐहिक जीवनात ती उतरू षकणारच नाही. धर्मनिरपेक्षता कायद्याने प्रतिष्ठित केली जाणारी बाब नसून ती मनुष्याच्या अंतःकरणातून व्यक्त होणे गरजेचे आहे. अन्यथा धर्मनिरपेक्षतेचे वाभाडे निघाल्याषिवाय राहणार नाही व व्यक्तीच्या वर्तणुकीत विसंवादच प्रत्ययास येईल."[10] यापुढे जाऊन म. गांधी म्हणतात, "राज्याने व्यक्तीच्या धर्मक्षेत्रात हस्तक्षेप करू नये. राज्याने माझ्या धर्मक्षेत्रात हस्तक्षेप केल्यास मी त्यास नकार दर्षविण" धर्म व राजकारण ही क्षेत्रे भिन्न न मागता ती परस्परपूरक मानावीत व तोच मुळाधार भारतीय तत्वज्ञानाचा असल्याचे गांधी प्रतिपादन करतात. येथील सुक्ते, ऋचा, संतवचने यातून व्यक्त होणारा तोच भाव आहे. त्यामुळे भारतीय दर्षनषास्त्रातील 'सेक्युलर' संकल्पना पाष्चात्यांच्या तुलनेत वैषिष्टयपूर्ण ठरते.

**समारोप**

प्रजासत्ताक भारतात मात्र 'सेक्युलॅरिझम' चा अर्थ राजकीय पक्ष सोयीने घेत परस्परांवर चिखलफेक करताना आढळतात. कॉंग्रेसला भाजपाची विचारसरणी 'धर्मांध' वाटते तर भाजपाला कॉंग्रसची 'धर्मनिरपेक्षता' बेगडी (सुडो सेक्युलॅरिझम) अषी वाटते. इतरही राजकीय पक्ष सोयीनुसार त्याचा अर्थ काढत असतात. 1989–2011 या कालखंडातील आघाडी सरकारच्या काळात 'धर्मनिरपेक्षतेच्या' अनेक सोयीपूर्ण व्याख्या निघाल्यात. अरूण षौरी यांचे 'रिलीजन ॲण्ड पॉलिटीक्स' डॉ. के. जी. सय्यदीन यांचे 'फेथ ऑन फेज एज्युकॅषनिस्ट', व्ही. के. सिन्हा यांचे 'सेक्युलॅरिझम इन इंडीया' ए. जी. नुराणी यांचे 'सेक्युलॅरिझम ॲण्ड मुस्लिम पर्सनलॉ', डॉ. श्रीपाल सबनीस यांचे 'सेक्युलॅरिझम : प्रबोधनाचा मानदंड' इ. पुस्तकातील उदधृत विचारांची तपासणी केल्यास 'सेक्युलॅरिझम' चा राजकीय सत्तेच्या दृष्टिकोनातून विचार व्यक्त केल्याचे स्पष्टपणे जाणवते. भारतीय दर्षनषास्त्रातील मूळ गाभा तत्वाचा विसर



Scanned with CamScanner

पडू देऊन मांडणी केली जाऊ लागल्याने ते सत्यान्वेषापासून दूर गेले आहे. म. गांधीनी व्यक्त केलेली भावना ज्यावेळेस अविष्कृत होईल तेव्हाच 'सेक्युलर' बाबतचा विवाद व गैरसमज दूर होतील अन्यथा धर्माच्या आधारावर होणारी लंगडेतोड सुरूच राहील. डॉ. राधाकृष्णनच्या षब्दात व्यक्त करावयाचे झाल्यास, "जो मानवता जोडण्याचे कार्य करतो तो धर्म, जो तोडण्याचे कार्य करतो तो अधर्म" यातच 'सेक्युलॅरिझम' सामावलेला आहे.

**तळटीपा**

१. लोकषाहीची नवी क्षितीजे, राजारामबापू पाटील पृ. 6
२. इहवादी षासन, पु. ग. सहस्त्रबुद्धे पृ. 47
३. कित्ता, पृ. 48
४. तीन देषांच्या राज्यघटना, प्रा. अडगावकर, प्रा. षेख, प्रा. देषमुख, पृ. 129
५. इहवादी षासन, पु. ग. सहस्त्रबुद्धे पृ. 49
६. भारतीय गणराज्याचे षासन व राजकारण, डॉ. भा. ल. भोळे पृ. 25
७. गांधी विचारदर्षन (भाग 1), अनु. भाऊ धर्माधिकारी पृ. 19
८. गांधी विचारदर्षन (भाग 2), अनु. भाऊ धर्माधिकारी पृ. 42
९. कित्ता पृ. 43
१०. गांधी विचारदर्षन (भाग 1), अनु. भाऊ धर्माधिकारी पृ. 27



Scanned with CamScanner